मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » रविवार, दि. 15 डिसेंबर 2024 | पान- 1

# पिंपरी चिंचवडमध्ये भाजपाची ताकद वाढली : रावसाहेब दानवे

## महापालिकेवर पुन्हा निर्विवाद सत्ता येणार : विधानसभा निवडणुकीत जनतेने भरभरून कौल दिला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास, राज्यातील महायुती सरकारने केलेली विकास कामे आणि राबवलेले अनेक लोकाभिमुख उपक्रम यामुळेच विधानसभा निवडणुकीत जनतेने भरभरून कौल दिला. भोसरीत आमदार महेश लांडगे तिसऱ्यांदा आमदार झाले. तर चिंचवड मधून शंकर जगताप हे देखील मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. शहरात भाजपची ताकद पूर्वीपेक्षा वाढली आहे. त्यामुळे येणाऱ्या महापालिका निवडणुकीत भाजपची पुन्हा निर्विवाद सत्ता येणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे असा विश्वास माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केला.




प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात आमदार महेश लांडगे आणि आमदार शंकर जगताप यांच्या विजयानिमित्त त्यांच्या सत्कार रावसाहेब दानवे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, युवा मोर्चा अध्यक्ष अनुप मोरे, माजी खासदार अमर साबळे, राजेश पिल्ले, सदाशिव खाडे, मोरेश्वर शेडगे, बापू काटे, कुणाल वाव्हळकर, नामदेव ढाके, विलास मडिगेरी, अजय पाताडे, संजय मंगोडेकर, शितल शिंदे, शैला मोळक, राज तापकीर, राजू दुर्गे, विजय फुगे, कैलास कुटे, गणेश लंगोटे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना रावसाहेब दानवे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीपूर्वी महाविकास आघाडीने विजयाची स्वप्ने पाहिली. कुठल्या नेत्याला कुठलं खातं द्यायचं. कोणाला मंत्री पद द्यायचं. कोणाला जेलमध्ये टाकायचं हे सर्व ठरवलं होतं. पण, जनता सुज्ञ असल्याने मतदारांनी आम्हाला कौल दिला. विरोधक अद्यापही हार मानायला तयार नाहीत. ते आता ईव्हीएमला दोष देत आहेत. ते नागरिकांना काही बोलू शकत नाहीत.

गेल्या ४५ वर्षात आम्ही अनेक निवडणूका पाहिल्या, लढलो. हार पत्करली. पण, आम्ही कधी संशय घेतला नाही. आता विजयी झालो तर विरोधक ईव्हीएम घोटाळ्याचा आरोप करत आहेत. लोकसभेत आम्हाला अपयश आलं. हरियाणा, कर्नाटकमध्ये हरलो. तेव्हा आम्ही संशय व्यक्त केला नाही. विरोधकांना पराभवाचे कारण शोधता येत नसल्याने ते ईव्हीएमला दोष देत आहेत, असं मत दानवे यांनी व्यक्त केलं आहे. प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात आमदार महेश लांडगे आणि आमदार शंकर जगताप यांच्या विजयानिमित्त त्यांच्या सत्कार रावसाहेब दानवे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

# प्रधानमंत्री मातृवंदना योजनेचा मावळमधील आदिवासी पाड्यावरील महिलांनाही मिळणार लाभ

## खासदार श्रीरंग बारणे यांच्या तारांकीत प्रश्नाला महिला व बालविकास मंत्र्यांचे उत्तर

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघात आदिवासींचे प्रमाण जास्त आहे. या महिलांना कागदपत्राअभावी प्रधानमंत्री मातृवंदना योजनेचा लाभ घेताना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यातून मार्ग काढण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी तारांकीत प्रश्नाद्वारे लोकसभेत केली. त्यावर आदिवासी पाड्यावरील महिलांनी अपत्य झाल्यानंतर केव्हाही अंगणवाडी, आशा सेविकांच्या माध्यमातून अर्ज करावा. त्यांना लाभ दिला जाईल अशी ग्वाही केंद्रीय महिला व बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी दिली.



प्रधानमंत्री मातृवंदना योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलेला पहिल्या अपत्यासाठी 5 हजार रुपयांची रक्कम दोन हप्त्यांत, तर दुसरे अपत्य मुलगी झाल्यास मुलीच्या जन्मानंतर एकाच टप्प्यात 6 हजार रूपयांचा लाभ आधार संलग्न बँक खात्यात किंवा पोस्ट ऑफिसमधील खात्यात डीबीटीद्वारे जमा केला जात आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांना येत असलेल्या समस्यांबाबत खासदार श्रीरंग बारणे यांनी तारांकीत प्रश्न विचारला. ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोरगरीब, मजदूर या वर्गातील गरोदर महिलांसाठी प्रधानमंत्री मातृवंदना योजना सुरू केली आहे. गरीब महिलांसाठी अतिशय लाभदायक आणि महत्वाची ही योजना आहे. या योजनेतील महिला लाभार्थ्यांना विविध अडचणीचा सामना करावा लागत आहे. कागदपत्रे, लग्नाच्या अगोदरच आधारकार्ड वरील नाव, बँकेत खाते नसणे अशा अडचणींना सामोरे जावे लागते. या योजनांचा लाभ घेण्यासाठी ज्या अडचणी आहेत. त्या दूर करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जाणार आहेत. ही योजना आदिवासी महिलांपर्यंत पोहोचविली पाहिजे. मावळ लोकसभा मतदारसंघातील एका तालुक्यात आदिवासींचे प्रमाण जास्त आहे. या लोकांपर्यंत योजना पोहोचविली पाहिजे. त्यासाठी प्रयत्न करावेत. त्यांना लाभ मिळवून द्यावा अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

त्यावर उत्तर देताना महिला व बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी म्हणाल्या, महिलांच्या सुरक्षिततेसाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे. महिला, मुले सदृढ राहिले तरच सशक्त भारत होईल. प्रधानमंत्री मातृवंदना योजनेंतर्गत गरोदर महिलांना आर्थिक साहाय्य दिले जाते. समाजातील वंचित महिलांना मातृत्व लाभ देण्याचा योजनेचा हेतू आहे

# इच्छुकांचे लक्ष न्यायालयाच्या सुनावणीकडे

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक प्रकरणी 22 जानेवारीला सुनावणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी 22 जानेवारीला होणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर लवकरच महापालिका निवडणुका होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्या अनुषंगाने ही सुनावणी महत्त्वाची मानली जात आहे. त्यामुळे गेली दोन अडीच वर्षे महाालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या माजी नगरसेवकांबरोबरच अन्य इच्छुकांच्या कसोटीचा काळ ठरणार आहे. अजुन किती दिवस केवळ जनसंपर्कावरच भागवायचे? असा प्रश्न या इच्छुकांना भेडसावत आहे.



पिंपरी चिंचवड महापालिकेतील नगरसेवकांचा कार्यकाळ संपल्याने 13 मार्च 2022 पासून प्रशासकीय राजवट सुरू आहे. आज प्रशासकीय राजवटीला दोन वर्षे नऊ महिने पूर्ण झाले आहेत. आतापर्यंत या प्रशासकीय राजवटीत राजेश पाटील व शेखर सिंह या दोन आएएस अधिकाऱ्यांनी महापालिकेचा प्रशासक म्हणू कारभार सांभाळला आहे. नगरसेवकांचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर वेळेत निवडणूक पार पडली असती, तर आज या नगरसेवकांचा पाच वर्षांतील निम्मा कार्यकाळ संपला असता. मात्र अद्यापही कोणत्या ना कोणत्या कारणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या जात आहेत.

तर इच्छुकांची इच्छुकांची घालमेल वाढत आहे.प्रशसकीय राजवट सुरू झाल्यानंतर काही महिन्यांत हा प्रश्न मार्गी लागून महापालिका निवडणुकीला समोरे जाण्याची अनेकांनी तयारी केली होती. मात्र राज्यातील राजकीय अस्थिर वातावरणामुळे महापालिकेची निवडणूक लांबणीवर पडली. त्यानंतरही आशावादी असलेल्या इच्छुकांचा लोकसभा निवडणुकीने अपेक्षाभंग झाला. परंतु आता विधानसभा निवडणुकीनंतर महापालिका निवडणूक लवकर होण्याची चर्चा सुरु झालेली आहे.


विधानसभा निवडणुकीनंतर तरी महापालिका निवडणूक होण्याची शक्यता वाटत असल्याने हे इच्छुक पुन्हा सक्रीय झाल्याचे दिसून आले. जनसंपर्क कार्यालयात पुन्हा कार्यकर्त्यांचा गोतावळा दिसू लागला आहे. सर्वोच्च न्यायालयाने याची सुनावणी 22 जानेवारीला ठेवली असून या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आरटीई प्रवेश प्रक्रिया सोमवारपासून

## प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांची माहिती, पहिल्या टप्प्यात शाळांच्या नोंदणीसह ऑनलाइन प्रवेश

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील खासगी शाळांमध्ये केल्या जाणाऱ्या २५ टक्के राखीव जागांवरील आरटीईची प्रवेश प्रक्रिया सोमवार (दि. १६) पासून सुरू केली जाणार आहे. यासाठीचे वेळापत्रक तयार केले जात असून इतर आवश्यक तयारी प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून सुरू झाली असल्याची माहिती शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिली.




मागील वर्षी विविध कारणांमुळे आरटीईची प्रवेश प्रक्रिया लांबणीवर पडली होती. यामुळे प्रशासन आणि शाळांसह पालकांनाही याचा त्रास सोसावा लागला होता; मात्र यंदाचे प्रवेश लवकर सुरू करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने आदेश दिल्याने आरटीईच्या प्रवेश प्रक्रियेची सुरुवात १५ डिसेंबरपासून केली जाणार आहे. यासाठी प्रवेशाचा एकूण कार्यक्रम त्याचे वेळापत्रकही पुढील काही दिवसात जाहीर केले जाणार असल्याची माहिती संचालक गोसावी यांनी दिली.

आरटीई प्रवेशाच्या पहिल्या टप्प्यात शाळांची नोंदणी केली जाणार आहे. या नोंदणीसाठी आवश्यक असलेली माहिती या आधीच विभागाकडे तयार असून काही नवीन शाळा, वाढलेल्या वर्ग तुकड्या आणि त्यातील वाढलेल्या प्रवेशाच्या जागांची माहिती काही दिवसांच्या आत जमविण्याचे नियोजन आहे. यानंतर लगेचच मुलांच्या प्रवेशासाठीच्या नोंदणीला सुरुवात होईल आणि मुदतीत ही प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन केले जात असल्याचेही संचालक गोसावी यांनी सांगितले.

दरम्यान, राज्यातील खासगी व्यवस्थापनाच्या शाळा, संस्थांनी पूर्व प्राथमिक आणि प्राथमिकच्या सर्व प्रवेशाची प्रक्रिया सुरू केली आहे. काहींनी थेट प्रवेश देऊन बाकीची सर्व प्रक्रिया करून घेतली आहे. अनेक महत्त्वाच्या शाळांमध्ये आरटीईसाठी उपलब्ध असलेल्या जागाही काही शाळा याच कालावधीत आपल्याकडे आलेल्या प्रवेशातून भरून घेतात. यामुळे याच काळात आरटीईची प्रवेश प्रक्रियाही तत्काळ सुरू करण्याची मागणी आप पालक युनियनसह इतर पालक संघटनांनी केली होती. या मागणीपूर्वीच विभागाने आरटीईची प्रवेश प्रक्रिया राबविण्याची तयारी दर्शवली आहे.

राज्यातील खासगी शाळांमध्ये केल्या जाणाऱ्या २५ टक्के राखीव जागांवरील आरटीईची प्रवेश प्रक्रिया सोमवार (दि. १६) पासून सुरू केली जाणार आहे. यासाठीचे वेळापत्रक तयार केले जात असून इतर आवश्यक तयारी प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून सुरू झाली असल्याची माहिती शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिली.

### यंदा 26 हजार 840 जागा राहिल्या रिक्त

» शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत पुणे जिल्ह्यात दरवर्षी आरटीईचे सर्वाधिक प्रवेश होतात. यंदा ९७० शाळांमध्ये आरटीईच्या १७ हजार ५८८ जागा उपलब्ध होत्या. त्यासाठी ४८ हजार १५५ अर्ज आले होते. त्यामुळे पहिली यादी आणि तीन प्रतीक्षा यादी मिळून पुणे जिल्ह्यात तब्बल १३ हजार ६६७ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले होते. दरम्यान, शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत यंदा राज्यात ७८ हजार ३९८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाल्याचे स्पष्ट झाले होते. उशिरा प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यामुळे सर्व फेऱ्यांनंतरदेखील २६ हजार ८४० जागा रिक्तच राहिल्याचे स्पष्ट झाले आहे.

---

# स्पर्धा परीक्षा उमेदवारांना महापालिकेचे पाठबळ

## अभ्यासिका उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचेही आयुक्तांनी सांगितले.

**पुणे | प्रतिनिधी**

स्पर्धा परीक्षा उमेदवारांसाठी नाममात्र दरात जागा उपलब्ध करुन देण्यासाठी लवकरच जागा निश्चित केल्या जाणार आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिली. त्या अंतर्गत सातशे ते हजार विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचेही आयुक्तांनी सांगितले.



स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी राज्यभरातून हजारो उमेदवार पुण्यात येतात. मात्र, त्यांना अभ्यासासाठी पुरेशी जागा नसते. आर्थिक ओढाताण करत या मुलांना अभ्यासासाठी खासगी अभ्यासिकांचा आधार घ्यावा लागतो. गेल्या काही वर्षांत शहरात स्पर्धा परीक्षा उमेदवारांची संख्या लक्षणीय वाढली आहे. प्रामुख्याने सदाशिव पेठ, नवी पेठ, नारायण पेठ, शिवाजीनगर, शास्त्री रस्ता या भागांत या विद्यार्थांसाठी मार्गदर्शन वर्ग भरवले जातात. त्यानंतर संपूर्ण दिवसभर विद्यार्थी वेगवेगळ्या अभ्यासिकांमध्ये असतात. मात्र, अनेक अभ्यासिका कोणत्याही सुरक्षा उपाययोजना न करताच उभारण्यात आलेल्या आहेत.

काही दिवसांपूर्वी एका अभ्यासिकेला आग लागल्यानंतर सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला. ही बाब लक्षात घेऊन अभ्यासिकांमध्ये सुरक्षा उपाय योजनांच्या अंमलबजावणीसह स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थांना सुरक्षित आणि शांततेमध्ये अभ्यास करता यावा, यासाठी महापालिकेच्या काही शाळांची जागा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. यासाठी काही शाळादेखील निश्चित केल्याचे आयुक्त भोसले यांनी सांगितले.

स्पर्धा परीक्षा उमेदवारांसाठी नाममात्र दरात जागा उपलब्ध करुन देण्यासाठी लवकरच जागा निश्चित केल्या जाणार आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिली

# महापालिकेच्या निष्क्रियतेचा 70 कोटींचा फटका

## जी-20 परिषदेवेळी दिलेला निधी खर्च केलाच नाही

**पुणे | प्रतिनिधी**

“जी-२०’ परिषदेनिमित्त शहरातील विकासकामांसाठी २५० कोटी रु. शानाकडून पालिकेला मिळाले होते. त्यातील तब्बल ७० कोटींचा निधी परत जाणार जाणार आहे. प्रशासनाच्या निष्क्रिय कारभारामुळे ही स्थिती उद्भवली आहे. मागील दोन वर्षांत प्रशासनाला हा निधी खर्च न करता आलेला नाही.



नियोजनाचा अभाव, विकासकामांबाबत उदासिनता तसेच अधिकाऱ्यांच्या मनमर्जी कारभारामुळे हा निधी परत जाणार असून याला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित केला जात आहे. शहरामध्ये शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी आंतरराष्ट्रीय जी^२० शिखर परिषदेच्या बैठका पुण्यात जानेवारी आणि नोव्हेंबर २०२३ मध्ये झाल्या. मात्र, त्याची तयारी शासनाकडून २०२२ पासूनच सुरू करण्यात आली होती. या निमित्त शहरात २० देशांचे प्रतिनिधी सहभागी होणार असल्याने तसेच जागतिक बँक, आशियाई बँकेचे प्रतिनिधीही सहभागी होणार असल्याने ही पर्वणी होती.

त्या निमित्ताने शहरात सुशोभीकरणासह, रस्त्यांची दुरूस्ती आणि इतर विकासकामे करण्यात आली. या परिषदेसाठी शासनाने महापालिकेस आधी ५० कोटी आणि नंतर २०० कोटी असा २५० कोटींना निधी दिला. या निधीतून महापालिकेने जवळपास तेवढी कामे प्रस्तावित करत शासनास यादीही सादर केली होती. मात्र, प्रशासनाला हा सर्व निधीही खर्च करता आलेला नाही.

शासनाने विधानसभा निवडणुकांआधी राज्यात काही कल्याणकारी योजना लागू केल्या. यामुळे शासनाच्या तिजोरीवर आर्थिक ताण आला. यावर स्थानिक स्वराज्य संस्थांकडे शासनाने अनुदान म्हणून दिलेला, मात्र खर्चीन पडलेला निधी परत मागितला आहे. त्यात २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून देण्यात आलेल्या निधीचा समावेश आहे. शासनाने महापालिकेला जी-२० साठी आधी दिलेल्या अनुदानातून ५० कोटींमधील केवळ ३७ कोटीच महापालिकेने खर्च केले असून १३ कोटींची कामे केवळ कागदावर प्रस्तावित आहेत. तर नंतर दिलेल्या २०० कोटींमधून १४३ कोटींची कामे सुरू असून ५७ कोटींचा निधी अखर्चित आहे. त्यामुळे शासनाने पत्र पाठवत हा ७० कोटींचा निधी परत मागितला आहे.

# तक्रारींची दखल न घेतल्यास कारवाई

## आयुक्त शेखर सिंह यांचा इशारा : स्मार्ट सारथीवरील तक्रारींचे निराकरण करण्याचे सर्व विभागप्रमुखांना आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांच्या समस्या सोडवून एकूणच पायाभूत सुविधांची पूर्तता करून राहणीमान सुधारण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे. नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा, व नागरिकांना या सेवांमुळे मिळणारे समाधान आणि महानगरपालिकेचे नागरिकांप्रती असलेले उत्तरदायित्व जोपासण्यासाठी, महानगरपालिकेने सर्वसमावेशक यंत्रणा सुरू करून स्मार्ट सारथी तक्रार निवारण प्रणालीमध्ये सकारात्मक बदल केले आहेत. यापुढे सारथीवर आलेल्या तक्रारींवर समाधानकारक कार्यवाही झाल्याबाबत तक्रारदारालाच दूरध्वनीद्वारे संपर्क साधून विचारणा करण्यात येणार आहे. तसेच तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार महापालिकेने केलेल्या कामाचे मूल्यांकन करण्यात येणार आहे.



तक्रारदाराने केलेल्या तक्रारीचे महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडून निवारण करून ती बंद केल्यानंतर त्याबाबत संबंधित तक्रारदाराचे समाधान झाले की नाही, यांचे मूल्यांकन करण्यासाठी आणि सेवा वितरणातील तफावत ओळखण्यासाठी महानगरपालिकेकडून तक्रारदाराला दूरध्वनीद्वारे संपर्क साधून अभिप्राय घेण्यात येणार आहेत. याचबरोबर, नागरिकांकडून दाखल करण्यात आलेल्या तक्रारींचे समाधानकारक निराकरण न झाल्यास संबंधितांची चौकशी किंवा कारवाई करण्यात येणार आहे. तसेच समस्यांचे समाधानकारक निराकरण करण्यासाठी कठोर उपाययोजनांची अंमलबजावणी देखील करण्यात येणार आहे.

### तक्रारीकडे होणार नाही दुर्लक्ष याची घेणार काळजी

गेल्या सहा महिन्यांमध्ये ज्या नागरिकांनी महानगरपालिकेच्या स्मार्ट सारथीवर तक्रारी नोंदविल्या आहेत आणि ज्या नागरिकांच्या तक्रारींवर कोणतीही कार्यवाही न करता त्या बंद केल्या गेल्या आहेत ते नागरिक त्यांची तक्रार पुन्हा स्मार्ट सारथीवरून उघडू शकतात. त्यानंतर संबंधित तक्रारीवर योग्य कार्यवाही व्हावी, यासाठी ती वरिष्ठ अधिकारी किंवा विभागप्रमुखांकडे पाठवण्यात येणार आहे. स्मार्ट सारथीद्वारे येणाऱ्या कोणत्याही तक्रारीकडे दुर्लक्ष होणार नाही, याची पूर्णपणे काळजी महानगरपालिकेकडून घेण्यात येणार आहे.

### मागील महिन्यामध्ये ८,०७६ तक्रारींचे निरसन

चालू वर्षातील १ नोव्हेंबर ते ९ डिसेंबर या कालावधीमध्ये महानगरपालिकेच्या स्मार्ट सारथीद्वारे नागरिकांनी नोंदविलेल्या एकूण ८,०७६ तक्रारी दूर करण्यात आल्या आहेत. यामधील ५,३४९ तक्रारदारांचे दूरध्वनीद्वारे संपर्क साधून अभिप्राय घेण्यात आले असून ६३ टक्के तक्रारदारांनी झालेल्या कामाबाबत समाधान व्यक्त केले आहे, तर यामधील ८ टक्के तक्रारदारांनी असमाधान व्यक्त केले असून त्यामधील २ टक्के तक्रारदारांनी तक्रारी कोणत्याही कारवाईशिवाय बंद केल्या असल्याचे सांगितले आहे. तसेच २९ टक्के तक्रारदारांना त्यांच्या समस्या दूर झाल्याबाबत दूरध्वनीवर संपर्क साधला असता त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद आलेला नाही.

### तक्रारींच्या पॅटर्नचे केले जाणार विश्लेषण

» महानगरपालिकेकडून नागरिकांच्या येणाऱ्या तक्रारींचे विस्तृत विश्लेषण केले जाणार असून एखाद्या परिसरातून अधिकच्या तक्रारी का येतात, याचा देखील अभ्यास केला जाणार आहे. तसेच तक्रारींचा पॅटर्न लक्षात घेऊन त्यावर विश्लेषण करून संकलित केलेल्या माहितीच्या आधारावर कार्यवाही करण्यावर महापालिका भर देणार आहे. यामुळे तक्रारींचे निवारण करण्यासोबतच नागरिकांना चांगल्या दर्जाच्या सेवा देण्यास मदत मिळणार आहे.

# सदनिकांच्या अर्जांसाठी दोनच दिवस शिल्लक

## दोन हजार 864 जणांची अनामत रक्कम जमा, दोनदा मुदतवाढ देऊन वाढली अर्जांची संख्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पेठ क्रमांक १२ आणि पेठ क्रमांक ३०-३२ येथे सर्वांसाठी परवडणारी घरे योजनेंतर्गत सदनिकांच्या लॉटरीचा शुभारंभ करण्यात आला होता. या लॉटरीला तब्बल दोन वेळा मुदतवाढ दिल्याने प्रतिसाद मिळाला. आतापर्यंत २ हजार ८६४ नागरिकांनी अनामत रक्कम जमा केली आहे. नागरिकांना पीएमआरडीएच्या सदनिकांसाठी आणखी दोन दिवस म्हणजेच १५ डिसेंबर २०२४ पर्यंतच अर्ज करता येणार आहे.




पीएमआरडीच्या पेठ क्रमांक १२ येथील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ईडब्ल्यूएस (१ बीएचके) प्रवर्गातील ४७ सदनिका व एलआयजी (२ बीएचके) प्रवर्गातील ६१४ सदनिकांची लॉटरी काढण्यात येणार आहे. यासह पेठ क्रमांक ३०-३२ येथे ईडब्ल्यूएस (१ आरके) प्रवर्गात ३४७ तसेच एलआयजी (१ बीएचके) प्रवर्गातील ३२९ सदनिका अशा एकूण १ हजार ३३७ शिल्लक असलेल्या सदनिकांच्या लॉटरी काढण्यात येणार आहे. यासाठी १२ ऑक्टोबरपासून अर्ज मागविण्यात येत आहे. यात शुक्रवार, १३ डिसेंबर दुपारपर्यंत २ हजार ८६४ जणांनी अनामत रक्कम भरली आहे. या सदनिकांसाठी रविवार, १५ डिसेंबर २०२४ पर्यंतच अर्ज भरता येणार आहे. इच्छुक नागरिकांनी HTTPS://HOUSING.PMRDA.GOV.IN या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी केले आहेत.

दरम्यान, सदनिकांसाठी पहिल्यांदा अर्ज मागवले होते तेव्हा निम्म्याच जणांनी अनामत रक्कम भरली होती. त्यामुळे पुन्हा या प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र या वेळेमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नागरिकांना मिळाल्याने तसेच, विधानसभा निवडणुका आणि संकेतस्थळाला तांत्रिक अडचण आल्याने अर्जांची संख्या घटली होती. त्यामुळे पुन्हा म्हणजेच तिसऱ्यांदा या प्रक्रियेला मुदतवाढ घोषित केली होती.

### ...तर एक अर्ज होणार बाद

» दोन वेगवेगळ्या प्रकल्पातील सदनिकांसाठी नागरिकांनी एकच अर्ज भरण्याची शक्यता आहे. त्यामुळे दोघांपैकी एकच अर्ज ग्राह्य धरणात येणार आहे. त्यामुळे एकूण अर्जांची संख्या तेवढी कमी होईल. तसेच, त्यांना पुन्हा अनामत रक्कम देखील द्यावी लागणार आहे. मात्र सद्यस्थितीमध्ये शिल्लक असलेल्या सदनिकांच्या तिप्पट अर्ज दाखल झाले आहेत.

# पुस्तकांतून साकारले विश्वविक्रमी सरस्वती चिन्ह!

## पुणे पुस्तक महोत्सवात भरगच्च कार्यक्रमांची मेजवानी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे पुस्तक महोत्सवाच्या पूर्वसंध्येला पुस्तकांचा वापर करून सरस्वती चिन्ह साकारण्याचा विश्वविक्रम नोंदवण्यात आला. विविध निकषांवर मूल्यमापन करून 'गिनेस वर्ल्ड रेकॉर्ड'च्या अधिकाऱ्यांनी विश्वविक्रम नोंदवला गेल्याची अधिकृत घोषणा करून प्रमाणपत्र प्रदान केले. या विश्वविक्रमासाठी ४ हजार १८९ पुस्तकांचा वापर करण्यात आला.



राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या अनुषंगाने विश्वविक्रम नोंदवण्याच्या कार्यक्रमावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार चित्रा वाघ, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष डॉ. मिलिंद मराठे, लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटीचे अध्यक्ष किरण ठाकूर, पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, कृष्णकुमार गोयल, संयोजन समितीचे सदस्य प्रसेनजित फडणवीस, बागेश्री मंठाळकर, ॲड. मंदार जोशी, डॉ. संजय चाकणे, गिनेस वर्ल्ड रेकॉर्डचे अधिकृत अधिकारी प्रवीण पटेल, मिलिंद वर्लेकर या वेळी उपस्थित होते. विश्वविक्रमी कलाकृतीसाठी नीलकंठ प्रकाशन, राष्ट्रीय पुस्तक न्यास यांच्या पुस्तकांचा वापर करण्यात आला.

विश्वविक्रमासाठीची कलाकृती किमान एक हजार चौरस मीटरची असणे, सुस्थितीत असलेल्या पुस्तकांचा वापर, जागा रिकामी न राहणे, पाच वेगवेगळे रंग असणे अशा विविध निकषांवर या कलाकृतीचे मूल्यमापन करण्यात आले. त्यानुसार साकारलेली कलाकृती पात्र ठरून विश्वविक्रम नोंदवला गेला आहे, अशी घोषणा प्रवीण पटेल यांनी केली.

वाचनाने व्यक्तिमत्त्व समृद्ध होते. त्यामुळे वाचन अत्यंत महत्त्वाचे आहे. हा महोत्सव केवळ पुण्यात न करता त्याची चळवळ होण्यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये हा महोत्सव झाला पाहिजे. लोकांना वाचायला आवडते, त्यांना तसे मंच उपलब्ध करून दिले पाहिजेत, असे चित्रा वाघ यांनी सांगितले. पुणेकरांचे पुस्तकांवर किती प्रेम आहे हे पुणे पुस्तक महोत्सवाला मिळत असलेल्या प्रतिसादावरून दिसून येते. यंदा पुस्तक प्रदर्शनासह साहित्य, खाद्य, सांस्कृतिक महोत्सव, बालचित्रपट महोत्सव होणार आहे. यंदाच्या महोत्सवाचा प्रारंभ सरस्वती यंत्राचा विश्वविक्रम नोंदवून होत आहे, याचा आनंद असल्याचे पांडे यांनी सांगितले.

### मुलांच्या मोबाइल वापराबाबत विचार करण्याची गरज

**» सांस्कृतिकनगरी असलेल्या पुण्यात असलेली विचारांची पोकळी भरून काढण्यासाठी पुस्तक महोत्सव, चर्चा होणे महत्त्वाचे आहे. ऑस्ट्रेलियाने लहान मुलांच्या मोबाइल वापरावर बंदी घातली आहे. मुलांची दिशाभूल होणारे साहित्य मोबाइलवर येणार याची काळजी घेतली पाहिजे. केंद्र सरकार डीपफेकविरोधात कायदा करत आहे. मात्र, मुलांच्या मोबाइल वापराबाबत गांभार्याने विचार करण्याची गरज आहे, असे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नमूद केले.**

" पुणे पुस्तक महोत्सवाला यंदा राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले असून, त्याला आता आंतरराष्ट्रीय करण्यासाठी आपल्या सर्वांनी प्रयत्न करायला हवा. यंदाच्या महोत्सवात सर्व भाषांमधील सुमारे विविध भाषेतील साधारण ८० पेक्षा अधिक पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. या महोत्सवात नागरिकांना लेखक, साहित्यिक, विचारवंत, कवी, पत्रकार यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे सर्वांनी पुणे पुस्तक महोत्सवाला भेट देऊन वाचन संस्कृतीला पाठिंबा बळकट करावे.

**- राजेश पांडे, मुख्य संयोजक, पुणे पुस्तक महोत्सव.**

# लवकरच मादी बिबटची नसबंदी होणार!

## वन विभागाकडून प्रयत्न सुरु : केंद्र सरकारकडे मादीच्या नसबंदीसाठी प्रस्ताव

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर परिसरामध्ये बिबट्यांनी धुमाकूळ घातला असून, मादी बिबटची नसबंदी करावी, अशी अनेक दिवसांपासूनची मागणी होती. त्या मागणीला अनुसरून वन विभागाने केंद्र सरकारकडे मादीच्या नसबंदीसाठी प्रस्ताव पाठवला आहे. त्यावर सकारात्मक विचार होणार असल्याने लवकरच मादी बिबटची नसबंदी होऊ शकणार आहे.



जुन्नर उपवन विभाग क्षेत्रात बिबट प्रजनन नियंत्रण करण्यासाठी सातत्याने वन विभाग प्रयत्न करत आहे. त्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या जात असून, आता मादी व नर बिबटची नसबंदी करण्याचा उपाय करण्यात येणार आहे. त्यासाठी काही दिवसांपूर्वी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनीदेखील मागणी केली होती. संसदेमध्येही त्यांनी हा विषय मांडला होता. राज्याच्या वन्यजीव विभागाने ११ नर आणि ३६ मादी बिबट्यांवर गर्भनिरोधक उपाययोजना करण्यासाठीचा प्रस्ताव केंद्रीय वन विभागाच्या अतिरिक्त महासंचालकांकडे सादर करण्यात आला आहे.

जुन्नर उपवन विभाग क्षेत्रातील जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरूर तालुक्यात बिबट्यांकडून दररोज हल्ले होत आहेत. त्यामुळे अनेकांना जीव गमवावा लागला आहे. गेल्या काही वर्षांत बिबट्यांच्या हल्ल्याचे प्रमाण वाढत आहे.

वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक पातळीवर ११ नर आणि ३६ मादी बिबट्यांवर गर्भनिरोधक उपाययोजना करण्याचा प्रस्ताव केंद्रीय वन विभागाच्या अतिरिक्त महासंचालकांकडे मान्यतेसाठी सादर केला आहे. या प्रस्तावात वन्यजीव संस्थेच्या सहकार्याने नर आणि मादी बिबट्यांच्या ग्रंथींचा अभ्यास व गर्भनिरोधन यावर भर देण्यात येणार आहे. त्याचबरोबर बिबटप्रवण क्षेत्रातील बिबट्यांच्या हालचाली, खाद्य या बाबींचाही अभ्यास केला जाणार आहे. त्यामुळे जर या प्रस्तावाला मंजुरी मिळाली तर बिबट्यांच्या संख्येवर नियंत्रण मिळण्यासाठी मदत होणार आहे.

" बिबट नसबंदी करण्यासाठी आम्ही प्रस्ताव पाठवला आहे. त्यासाठी देहराडून येथील वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया या संस्थेनेदेखील शिफारस केली आहे. त्यामुळे सरकारकडून याविषयी लवकर निर्णय होऊ शकेल. त्यामुळे बिबट संख्येच्या नियंत्रणासाठी मदत होईल.

**- अमोल सातपुते, उपवनसंरक्षक, जुन्नर वन विभाग.**